प्रभावशाली आयुर्वेदाचार्य सन्मानाने वैद्य अविनाश अमृतवाड यांचा नितीन गडकरींच्या हस्ते गौरव

नांदेड : येथील श्री विश्वेश्वर आयुर्वेद पंचकर्म चिकित्सालयाचे संचालक डॉ. अविनाश अमृतवाड हे आपल्या संस्थेतून हजारो रुग्णांवर उपचार करताना नववैद्यांची नवनिर्मिती करण्याबरोबरच आयुर्वेदात संशोधन, शिक्षण, उपचार आणि समाजसेवा अशा विविध क्षेत्रात त्यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाची दखल घेत बैद्यनाथ व दै.सकाळ यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते रविवार, 10 ऑगस्ट रोजी त्यांना प्रभावशाली आयुर्वेदाचार्य या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. अविनाश अमृतवाड यांनी आयुर्वेदाला व्यवसाय न मानता साधना म्हणून स्वीकारले आहे. गुरुकुल संस्कृतीतील शिस्त, सेवाभाव आणि आचारधर्म यांच्यामुळे त्यांची कार्यशैली व जीवनदृष्टी आयुर्वेदाच्या समृद्ध परंपरेचे सजीव प्रतीक ठरली आहे.

त्यांचे कार्य एकविसाव्या शतकातील परंपरा आणि विज्ञानाचा सेतू असून, त्यांनी आयुर्वेदाला सामाजिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून पुन्हा जिवंत केले आहे.

रुग्णसेवा, उपचारांतील उल्लेखनीय योगदान :

डॉ. अविनाश अमृतवाड हे गेल्या 20 वर्षांहून अधिक काळापासून वैद्य अमृतवाड नदिडमधील श्री विश्वेश्वर आयुर्वेद पंचकर्म चिकित्सालय या केंद्राच्या माध्यमातून विविध जुनाट आणि गुंतागुंतीच्या आजारांवर उपचार करीत आहेत. त्यांच्या उपचार पद्धतीमध्ये पंचकर्म, आहारशुद्धी, मानसिक संतुलन आणि वनस्पतिजन्य औषधांचा संशोधनात्मक वापर यांचा संतुलित समावेश असतो. त्यांनी मेंदूविकार, वंध्यत्व, मणक्याचे विकार (स्पॉन्डिलायटीस, डिस्क प्रॉब्लेम्स), त्वचारोग, थायरॉईड, हृदयरोग यांसारख्या गंभीर व दीर्घकालीन विकारांवर हजारो यशस्वी केसेस हाताळल्या आहेत. विशेषतः महिला वंध्यत्वावर त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक आणि तांत्रिक दृष्टिकोनातून काम केले आहे. सर्गिक पद्धतीने गर्भधारणेसाठी त्यांनी रुग्णांची संपूर्ण जीवनशैली बदलून टाकली आहे. यामुळे अनेक महिलांना मातृत्वाचा आनंद मिळालेला आहे. तसेच मानसिक आजार, नैराश्य, वैवाहिक जीवनातील तणाव आणि विषयांवर त्यांनी पंचकर्म, मानसोपचार व आयुर्वेदीय औषधांचा योग्य संगम साधून रुग्णांना मानसिक शांतता मिळवून दिली आहे.

आयुर्वेदाला आदर्श मानून वाटचाल : वैद्य डॉ. अविनाश अमृतवाड

आतापर्यंत घडलेल्या आणि कोल्हटकर वैद्य परंपरेला अनुसरून काम करणाऱ्या माझ्या सर्व विद्यार्थ्यांमुळे विविध पुरस्कार आम्हास प्राप्त झाले आहेत. आदरणीय त्र्यंबक गोगटे सर, आदरणीय नाना जोशी सर यांच्या आयुर्वेद प्रचार व प्रसार कार्यावरून या पुरस्काराची उंची लक्षात येते. आयुर्वेद हा आत्मगुण आहे. तो प्रत्येकाच्या ठिकाणी रुजावा, हीच माझी सद्गुरुचरणी प्रार्थना आहे.

-वैद्य अविनाश अमृतवाड

श्री विश्वेश्वर आयुर्वेद पंचकर्म चिकित्सालय, नदिड

नांदेड ग्रामीण पोलीसांनी अवैध वाळूने भरलेली हायवा पकडली

नांदेड: नदिड ग्रामीण पोलीसांनी काळेश्वर मंदिराजवळच्या पुलावर थांबलेल्या एका हायवा गाडीची तपासणी केली तेंव्हा त्यात अवैध वाळू भरलेली होती. पोलीसांनी 50 लाखांची हायवा आणि 25 हजारांची वाळू असा 50 लाख 25 हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अंमलदार शंकर रेवण माळगे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.14 ऑगस्टच्या सुर्योदय होण्याअगोदर 5.25 वाजता पोलीस उपनिरिक्षक बाबुराव चव्हाण, पोलीस अंमलदार संतोष जाधव, खलील बेग, गवेंद्र सिरमलवार, हनवता कदम आणि शंकर माळगे हे गस्त करत विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिराकडे जात असतांना मंदिराजवळील ब्रिजसमोर त्यांना एक बिना नंबर असलेली हायवा गाडी दिसली. याची तपासणी केली असता त्यात चोरट्या पध्दतीची वाळू भरलेली होती. हायवा गाडी 50 लाखांची आणि 25 हजारांची वाळू असा 50 लाख 25 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दाखल झालेला गुन्हा क्रमांक 774/2025 मध्ये आरोपी या सदरात राहुल केशव पवार(27) रा.गोटका तांडा ता.लोहा जि.नांदेड आणि अभिषेक साहेबराव पवार (25) रा.खरबी ता.लोहा जि.नांदेड यांची नावे आहेत. पोलीस उपअधिक्षक रामेश्वर व्यंजने, पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी कामगिरी करणाऱ्या पोलीसांचे कौतुक केले आहे.

नांदेड परिक्षेत्रातील पोलीस ठाण्यांच्या मूल्यमापनात सोनखेड पोलीस ठाणे सलग चौथ्यांदा अव्वल

नांदेड : नदिड परिक्षेत्रातील (91) पोलीस ठाण्यांचे पोलीस कामकाजाशी संबंधित विषयावर दर महिन्यास परिक्षण करुन त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्याची योजना नदिड परिक्षेत्रात मागील नोव्हेंबर महिन्यापासून सुरु करण्यात आली आहे. गुन्हे निर्गती, गुन्हे उघडकीस आणण्याचे व मालमत्ता हस्तगत करण्याचे प्रमाण, अर्ज चौकशी, चारित्र्य पडताळणी, पासपोर्ट, समन्स व वॉरंट बजावणी, फरारी व पाहिजे असलेले आरोपी अटक करणे, प्रतिबंधक कार्यवाही. दोषसिध्दी, सीसीटीएनएस, अभिलेख अद्यावतीकरण, अवैध व्यवसाय विरोधी कारवाई इत्यादी बाबत प्रत्येक पोलीस स्टेशनने केलेल्या कामगिरीचे दरमहा परिक्षण करण्यात येते. उपरोक्त महत्वाच्या विषयात

सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या तीन पोलीस ठाण्यांना प्रत्येक महिन्यास अनुक्रमे 5,000, 3,000 व 2,000 रुपयांचे बक्षीस व प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात येते. नदिड परिक्षेत्रातील पोलीस ठाण्यांच्या एप्रिल ते जुलै दरम्यानच्या परीक्षणात, नदिड जिल्ह्यातील सोनखेड पोलीस ठाण्याने लागोपाठ चौथ्यांदा परिक्षेत्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. यामुळे, सोनखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री पांडुरंग माने यांचा पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी प्रशस्तीपत्र व १० हजार रुपयांचे बक्षीस देऊन सन्मान केला आहे. त्यांच्या यशात, अर्थातच त्यांच्या सहकारी अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा असल्याने त्यांचे देखील अभिनंदन करण्यात आले आहे.

गेल्या चार महिन्यांच्या परीक्षणात, सोनखेड पोलीस ठाण्याने सर्वच विषयांत सरस कामगिरी केली आहे. सोनखेड पोलीस ठाण्यात वायर्षी दाखल झालेल्या मालाविरुद्धच्या एकूण 78 गुन्ह्यांपैकी त्यांनी तब्बल 75 गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळवले आहे. त्याचप्रमाणे, यावर्षी विविध प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या एकूण (643) प्रलंबित मुद्देमालापैकी (333) मुद्देमालांची निर्गती करण्यात आली असून, नागरिकांकडून प्राप्त झालेले अर्ज, चारित्र्य पडताळणी व पासपोर्ट प्रकरणे यांची प्रलंबितता त्यांनी शून्यावर आणली आहे. आज मितीस, सोनखेड पोलीस ठाणे येथील प्रलंबित गुन्हे प्रकरणांची संख्या ही केवळ (7) एवढी आहे.

चालू महिन्याच्या म्हणजे जूले महिन्याच्या परीक्षणात, हिंगोली जिल्ह्यातील कुरुंदा व नदिड जिल्ह्यातील सिंदखेड यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या कामगिरीची देखील दखल घेऊन त्यांना प्रशंसापत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले आहे.

वजिराबाद भागातील 'फॅशन स्पा' सेंटरवर धाड
नांदेड मधील आठवड्यातील दुसरा प्रकार

नांदेड : वजीराबाद भागातील मुख्य वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या जुन्या भाजी मार्केटच्या इमारतीत चालू असलेल्या फॅशन स्पा सेंटरवर बुधवारी सायंकाळी पोलिसांनी धाड टाकून एक महिला व तीन पीडित तरुणी तसेच मॅनेजरसह पाच जणांना ताब्यात घेतले . धाड टाकल्यानंतर काहीजण विचित्र अवस्थेत आढळून आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. दरम्यान, घटनास्थळावरून बऱ्याच आक्षेपार्ह वस्तू पोलिसांनी जप्त केल्या असून, रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया वजीराबाद पोलीस स्थानकात सुरू होती.

काही दिवसांपूर्वी कॅनॉल रोडवरच्या स्पा सेंटरवर भाग्यनगर पोलिसांनी धाड टाकल्यानंतर शहरातील अन्य स्पा सेंटर चर्चेत आले होते. वजिराबाद भागातील फॅशन स्पा सेंटर मसाज्या नावाखाली खुल्या अवैध धंदे चालत असल्याची माहिती पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत गेल्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकातील अधिकाऱ्यांनी वजीराबाद पोलिसांना सोबत घेऊन संयुक्त कारवाई केल्याचे सांगण्यात आले. पोलिसांची धाड पडताच वेगवेगळ्या रूममध्ये विचित्र अवस्थेत असलेल्या ग्राहकांना चांगलाच घाम फुटला. पथकातील अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी तेथील स्पा ची तपासणी केल्यानंतर नको त्या वस्तू पोलिसांना आढळून आल्यानंतर जप्त करण्यात आल्या. त्यानंतर पोलिसांनी महिलेसह पीडित तरुणी व ग्राहकांना ताण्यात आणले. सदर तरुणी दिल्ली, आसाम व अन्य ठिकाणाहून आणण्याची चर्चा होत असली तरी, बाहेर राज्यातून अंड्या जाणाऱ्या तरुणांची रॅकेट कोण चालवतो ? हा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, पीडित मुलींची सुटका करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. सदरची कारवाई विशेष पथकातील अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व वजीराबादचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्यासह पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.

EXPLICIT FINANCE LIMITED

CIN : L65990MH1994PLC076788

Regd. Office : 305, SOHAN COMMERCIAL PLAZA, VASAI EAST, PALGHAR – 401 210

Website : www.explicitfinance.net Email : explicit_finance@rediffmail.com

STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2025

(Rs. in Lakhs except per share data)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30-06-25 (Unaudited)	Quarter ended 30-06-24 (Unaudited)
1	Total Income from operation	89.27	142.00
2	Net Profit (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	9.93	(9.51)
3	Net Profit (Loss) for the period before Tax (after Exceptional and/or Extraordinary items)	9.93	(9.51)
4	Net Profit /(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items	9.93	(9.51)
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	9.93	(9.51)
6	Equity Share Capital	926.76	926.76
7	Earnings Per Share (EPS) (for continuing and discontinued operations)		
	a) Basic	0.11	(0.10)
	b) Diluted	0.11	(0.10)

Notes:- 1) The above unaudited financial results for the quarter ended 30th June, 2025 have been reviewed and recommended by the Audit - Committee and approved by the Board of Directors of the company at their meeting held on 14th August, 2025. **2)** The figures for the corresponding previous period have been regrouped/reclassified wherever necessary, tomake them comparable. **3)** The above is an extract of the detailed format of quarterly financial results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the stock exchange website - www.bseindia.com and on Company's Website - www.explicitfinance.net .

By order of the Board
For Explicit Finance Limited
Gopal Dave
Chairman
DIN:00334120

Place : Mumbai
Date : 14-08-2025

नांदेड महापालिकेची प्रभाग रचना शासनाकडे दाखल

नांदेड : शासनाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मान्यतेने नांदेड महापालिकेच्या प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा महापालिकेने नगर विकास विभागाकडे सादर केला. शासन स्तरावर या प्रारूपाची तपासणी करून येत्या २५ ऑगस्टपर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केला जाणार असून सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीस प्रारूप प्रभाग रचनेची प्रसिद्धी करून त्यावर आक्षेप मागवण्याचे शासनाने नियोजन आहे. यापूर्वी २०२२ मध्ये तीन सदस्य प्रभात व सदस्यांच्या संख्येत वाढ करून प्रभाग रचना अंतिम करण्यात आली होती. परंतु आधी सर्वोच्च न्यायालयाचे ' जैसे थे ' चे आदेश आणि त्यानंतर शासनाने ड वर्गातील सदस्य व बहुसदस्य प्रभागांची संख्या २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे कायम ठेवण्याची कायद्या दुरुस्ती केली. त्यामुळे तीन सदस्य असलेल्या प्रभागाच्या आधारावर कामे करणाऱ्या इच्छुक उमेदवारांचे गणित बिघडले. सर्वोच्च न्यायालयाने महिनाभरात निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिल्यानंतर शासनाने सर्व महापालिकांना प्रभाग रचनेचा कालबद्ध कार्यक्रम देताना प्रभाग रचना व निवडणूक कार्यपद्धतीच्या आदेशात कोणताही बदल केला नव्हता. शासनाने ११ जून ते १३ ऑक्टोबर या काळात प्रभाग रचना तयार करण्यापासून अंतिम मान्यता देण्याच्या कार्यक्रम शासनाने जाहीर केला. निवडणूक विभागाने प्रत्येक प्रभागांमध्ये जाऊन सीमा निश्चिती, महामार्ग तसेच रस्त्यांच्या सीमा, २०१७ मधील मनपा निवडणुकीच्या वेळी दाखल झालेल्या हरकतींची तपासणी केली. आरक्षण निश्चिती नंतर मतदार यादी तपासणीचा कार्यक्रम जवळपास महिनाभर तरी चालेल. त्यामुळे नोव्हेंबर अखेरपर्यंत अ , ब , क महापालिकेच्या निवडणुकीची प्रशासकीय प्रक्रिया होईल.

त्यानंतर ड वर्गातील निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकते. प्रभागांचे आरक्षण अंतिम होऊन मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्याशिवाय निवडणुकांच्या तारखा घोषित करता येत नाहीत. त्यामुळे ठरलेल्या मुदतीत निवडणुका होणे शक्य नसल्याचे दिसून येते. तसे झाल्यास नांदेड मनपाची निवडणूक मार्च नंतरच शक्य असल्याचे सांगण्यात येते.

२०१७ च्या निवडणुकीप्रमाणे चार सदस्य असलेले२० प्रभाग व ८१ सदस्य इतके संख्याबळ आगामी मनपा निवडणुकीसाठी राहणार असले तरी बदलणाऱ्या राजकीय परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रभागाची रचना मात्र बदलली जाण्याची शक्यता असल्याची चर्चा दबक्या आवाजात होत आहे. तसे जर झाले तर अनेक इच्छुकांचे गणित बिघडणार आहे आणि त्यामुळे पक्षांतरही मोठ्या प्रमाणात व्हायची शक्यता नाकारता येत नाही.

दीड लाखावर भाविकांनी घेतले सत्य गणपतीचे दर्शन

अर्धापूर: दहा वर्षांनी श्रावणातील अंगारिका चतुर्थीचा योग आल्याने पहाटे तीन वाजेपासून भाविकांनी दर्शनासाठी दाबड येथील श्री सत्य गणपतीच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. लाखो भाविक दर्शनासाठी येणार असल्याचे माहित असूनही मंदिराचे प्रशासक असलेल्या तालुका प्रशासनाने योग्य ते नियोजन न केल्याने सोयी सुविधांच्या अभावामुळे आबालवृद्धांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागला. ऐनवेळी पोलिसांनी परिसराचा ताबा घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आधी राज्यातील गणेश भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या नदिड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यातील दाभड येथील श्री सत्य गणपती मंदिरात मंगळवारी श्रावण महिन्यातील अंगारिका संकष्ट चतुर्थी निमित्त लाखोंच्या संख्येने भाविक आले होते. या ठिकाणी तहसील प्रशासन हे प्रशासक असून, प्रशासकीय यंत्रणात उशिरा आल्याने येथील दर्शन रांगांचे नियोजन कोलमडले. प्रसाद वाटप करणाऱ्यांनी मुख्य प्रवेशद्वारावरच प्रसादाचे वाटप केल्याने मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले. प्रशासकीय यंत्रणेच्या न केलेल्या नियोजनामुळे भाविकांना खूप त्रास झाला. दर्शन रांगांचे नियोजन करण्यात आलेले नव्हते. चुकीच्या पद्धतीने अनेक जणांना दर्शनासाठी मुभा देण्यात आल्याने चेंगराचेंगरी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. ज्यावेळी दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपअधीक्षक डॅनियल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली अधार्पूर चे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी युद्ध पातळीवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात केला. तालुका प्रशासनाचे फसलेले नियोजन व भाविकांची झालेली गर्दी पाहता स्त्री व पुरुष दर्शन रांगेसाठी बॉरिकेटिंग नसल्याने महिला पोलिसांची भिंत तयार करून दर्शनासाठी आलेला महिलांना सुरक्षा प्रदान केली.

महिलेच्या पोटातून काढली तीन किलोची गाठ

उमरी : येथील परी हॉस्पिटलचे प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. माधव विभुते यांनी तालुक्यातील बोळसा येथील पन्नास वर्षाच्या पोटदुखीने त्रस्त असलेल्या महिलेवर अत्यंत अल्प खर्चात यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करून तिच्या पोटातून तीन किलो ची गाठ काढून तिला जीवदान दिले. इतक्या मोठ्या गाठीची शस्त्रक्रिया करण्याची उमरी शहरातील ही पहिलीच वेळ आहे. उमरी तालुक्यातील बोळसा येथील राजाबाई जळ्वा उल्लेवाड (५०) या महिलेला गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून पोटदुखीचा प्रचंड त्रास होता. त्या महिलेने दोन महिन्यांपूर्वी नदिड येथे सोनोग्राफी केली होती. तेव्हा तिच्या पोटात गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर शस्त्रक्रिया करून पोटातील गाठीचा हा गोळा बाहेर काढण्यासाठी नदिड येथील डॉक्टरांनी जास्तीचा खर्च सांगितल्याने तिचे कुटुंबीय थोडेसे निराश झाले होते. या महिलेने तिच्या कुटुंबीयांसह उमरी येथील परी हॉस्पिटलचे स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. माधव विभुते यांची भेट घेऊन सगळी हकीकत सांगितली. तेव्हा त्या कुटुंबाची जेमतेम परिस्थिती पाहून त्यांनी कमी खर्चात शस्त्रक्रिया करण्याचे ठरवले. राजाबाई उलेवाड यांच्यावर नुकतीच शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्यांच्या पोटातून तब्बल तीन किलो वजनाची गाठ यशस्वीरित्या काढण्यात आली. ही शस्त्रक्रिया यशस्वी करून डॉ. विभुते यांनी रुग्णाला जीवदान दिले, अशी प्रतिक्रिया तिच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.

JPT SECURITIES LIMITED

Regd. Office : SKIL House, 209, Bank Street Cross Lane, Fort, Mumbai – 400 023 **CIN** : L67120MH1994PLC204636

E-mail: company.secretary@jptsecurities.com, **Website**: www.jptsecurities.com, **Tel. No.**: +91-22-66199000, **Fax No.**: +91-22-22696024

Extract of the Statement of Audil Financial Results for the Quarter and Year ended 31st March 2025 (Rs in Lacs except otherwise stated)

Sr. No.	Particulars	Standalone				Consolidated			
		Quarter ended 30/06/2025 (Unaudited)	Quarter ended 31/03/2025 (Audited)	Quarter ended 30/06/2024 (Unaudited)	Year ended 31/03/2025 (Audited)	Quarter ended 30/06/2025 (Unaudited)	Quarter ended 31/03/2025 (Audited)	Quarter ended 30/06/2024 (Unaudited)	Year ended 31/03/2025 (Audited)
1	Total income from operations (net)	10.47	10.36	10.48	42.01	10.47	10.36	10.48	42.01
2	Net Profit / (Loss) for the Period (Before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	(3.36)	(22.83)	1.29	(19.95)	(3.36)	(22.39)	1.29	(19.51)
3	Net Profit / (Loss) for the Period Before Tax, (After Exceptional and/or Extraordinary Items)	(3.36)	(22.83)	1.29	(19.95)	(3.36)	(22.39)	1.29	(19.51)
4	Net Profit / (Loss) for the Period After Tax, (After Exceptional and/or Extraordinary Items)	(3.38)	(21.76)	1.29	(20.00)	(3.40)	(21.60)	1.21	(20.00)
5	Total Comprehensive Income for the period (Compersing Profit/(Loss) for the Period (After Tax) and Other Comprehensive Income (After Tax)	NA	NA	NA	NA	NA	NA	NA	NA
6	Equity Share Capital	300.60	300.60	300.60	300.60	300.60	300.60	300.60	300.60
7	Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year).	-	-	-	50.73	-	-	-	50.73
8	Earnings Per Share (of Rs. 10/- each) for Continuing and discontinued operations								
	Basic :	(0.11)	(0.72)	0.04	(0.67)	(0.11)	(0.72)	0.06	(0.67)
	Diluted:	(0.11)	(0.72)	0.04	(0.67)	(0.11)	(0.72)	0.06	(0.67)

NOTES :

1 The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Company's website at www.jptsecurities.com and the website of Stock Exchanges where the Equity Shares of the Company are listed i.e.,BSE Limited at www.bseindia.com.

2 The above Standalone and Consolidated Financial Results were reviewed by Audit Committee and thereafter approved by the Board of Directors in their respective Meeting held on 14-08-2025.

3 The Standalone Financial Results have have been prepared in accordance with Indian Accounting Standards (Ind-AS) notified under the Companies (Indian Accounting Standards) (Amendment) Rules, 2016. ,as amended and as prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules there under and other accounting principles generally accepted in India.

4 The figures for the quarter ended March 31, 2025 as reported in these financial results are balancing figures between the audited figures in respect of the Financial Year and restated year to date figures upto the end of the third quarter of the Financial Year.

5 The figures for the previous corresponding periods have been regrouped/rearranged, wherever necessary, to make them comparable.

By order of the Board of Directors
For JPT Securities Limited
Sd/-
CHINTAN RAJESH CHHEDA
Whole- Time Director
DIN : 08098371

Place: Mumbai
Date : August 14th 2025

ओव्हरटेक करताना टेम्पो उलटून फरफटत गेला; १ महिला ठार, ७ जखमी

राजापूर : तालुक्यातील मिठगवाणे येथील सागरी महामार्गावर झालेल्या टेम्पोच्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून, सात महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. खासगी आरामबसला ओव्हरटेक करताना टेम्पो सुमारे १०० ते १५० फूट रस्त्याच्या कडेला पलटी मारत फरफटत गेला. बुधवारी (दि.१३) हा अपघात झाला.

वाघ्रण येथील काही महिला टेम्पोतून बागकामासाठी जानशी पठारच्या दिशेने जात होत्या. वाटेत मिठगवाणे येथे आरामबसला ओव्हरटेक करताना टेम्पोचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यात टेम्पो उलटला आणि फरफटत गेला. टेम्पोतील सर्व महिला व एक छोटी मुलगी गंभीर जखमी झाली आहे. अपघातात टेम्पोचालक आणि केबिनमध्ये असलेले इतर पुरुष प्रवासीही जखमी झाले आहेत. जखमींना तत्काळ जैतापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, त्यानंतर अधिक उपचारासाठी त्यांना रत्नगिरी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला आहे.